जिल्हा परिषद सरळसेवा भरती- २०२३
कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-क या
पदावर नियुक्ती बाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद आदेश जा.क्र.कार्या-१/आस्था-३/ ८९ /२०२५
अहिल्यानगर दिनांकः- १३/०५ /२०२५

वाचा:- १.महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील परिशिष्ठ ६
२. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रानिमं-१२२२ प्र.क्र.५४ का-१३-अ दिनांक ०४ मे २०२२
३. महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय संकीर्ण-२०२२/प्र.क्र.११/ आस्था-८ दिनांक १५ मे २०२३
४. जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत गट-क मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात क्रमांक ०१/२०२३
५. आय.बी.पी.एस कंपनीकडील निकालपत्र दिनांक ०३/०५/२०२४
६. अंतिम निवडसुची प्रसिध्द दिनांक १२/०८/२०२४
७.महाराष्ट्र ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांचेकडील पत्र क्र.पदभ-१२४/प्र.क्र.२५१/आस्था दि.११/१२/२०२४ व दि.२२/०१/२०२५
८.मा.अध्यक्ष,जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचेकडील सुधारित अंतिम निवड सूची दि.२८/०२/२०२५

उपरोक्त संदर्भ क्रमांक २ ते ३ मधील महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील आदेशानुसार संदर्भ क्रमांक ४ अन्वये जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत जिल्हा सेवा वर्ग-३ कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-क या पदासाठी सरळसेवा भरती जाहिरात देण्यात आलेली होती. संदर्भ क्रमांक ५ नुसार प्राप्त निकाल तसेच संदर्भ क्रमांक ६ नुसार अंतिम केलेल्या निवडसुचीनुसार व संदर्भ क्र.७ मधील तरतुदीनुसार माजी सैनिक समांतर आरक्षणा अंतर्गत सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदाचा अनुशेष न ठेवता सदर रिक्तता माजी सैनिक व्यतिरिक्त त्या त्या सामाजिक प्रवर्गातील गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारामधून भरावयाची असल्याने संदर्भ क्र.८ अन्वये निवड यादीतील खालील नमुद करणेत आलेले उमेदवार यांची जिल्हा परिषद सरळसेवा भरती २०२३ अंतर्गत संदर्भ क्रमांक १ मधील तरतुदीनुसार कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-क या पदावर सुधारीत वेतन संरचना S14: 38600-122800 या वेतनश्रेणीमध्ये (अधिक नियमानुसार देय भत्ते) स्थानापन्न नियुक्तीने त्यांच्या नावासमोर नमुद केलेल्या ठिकाणी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करणेत येत आहे.

| अ.क्र | नियुक्त केलेल्या उमेदवाराचे नाव व पत्ता | उमेदवाराचा मुळ प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | श्री.ऋषीकेश शंकर कडभणे<br>पत्ता-जुना शिऊर रोड,जामखेड महाविदयालयाच्या मागे,छत्रपती शिवाजी नगर,मु.पो.ता.जामखेड जि.अहिल्यानगर पिनं-४१३२०१ | खुला | खुला सर्वसाधारण (माजी सैनिक ऐवजी) | जि.प.ग्रा.पा.पु. उपविभाग जामखेड |

नेमणुकीच्या **अटी** व शर्ती:-

१. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) गट-क या पदावर केलेली नेमणुक पुर्णतः हंगामी तात्पुरत्या स्वरुपाची असून कोणत्याही प्रकारची पुर्वसुचना व कारण न दाखवता जिल्हा परिषदेच्या सेवेतून कमी करण्याचा हक्क राखून

ठेवला आहे. तसेच सदर नेमणुकीमुळे त्यांना यापुढे शासकीय नेमणुकीसाठी कोणताही हक्क प्रस्थापित करता येणार नाही.

२. प्रथम नेमणुकीच्या ठिकाणी रुजू होणेसाठी कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च दिला जाणार नाही.

३. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील नियम ११ परिशिष्ट ३ मध्ये नमूद केल्यानुसार सदर पदावर रुजू झालेपासुन ३० दिवसांच्या आत जिल्हा शल्य चिकीत्सक अहमदनगर यांचेकडील शारिरिक दृष्टया पात्रते संबंधीचे वैद्यकिय प्रमाणपत्र नेमणुकीचे कार्यालयास सादर केले पाहिजे. वैद्यकिय प्रमाणपत्र सादर न केल्यास अथवा वैद्यकियदृष्टया शासकीय सेवेस अपात्र ठरल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता आपली नियुक्ती संपुष्टात आणणेत येईल याची नोंद घ्यावी.

४. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३/२०१७/१६-अ दिनांक २८/०८/२०१७ नुसार संबंधित उमेदवारांनी नियुक्तीनंतर सहा महिन्याच्या आत पोलीसांकडील चारित्र्य पडताळणी केले असलेबाबतचा अनुकुल अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर चारित्र्याबद्दलचा अहवाल सहा महिन्याच्या आत संबंधित कार्यालयाकडुन प्राप्त न झाल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता आपली नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल याची नोंद घ्यावी.

५. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) (सुधारणा) नियम २०२१ नुसार उमदेवाराने नियुक्तीचे वेळी खात्रीशीर कागदपत्री पुराव्यासह जन्म तारीख घोषीत करील. जेव्हा उमेदवारांची विहीत शैक्षणिक अर्हता ही माध्यमिक शालांत परिक्षा किंवा त्यावरील असेल, अशा बाबतीत, माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र हे वैध दस्ताऐवज असल्याचे मानण्यात येईल, अन्य बाबतीत स्थानिक स्वराज्य संस्थेने निर्गमित केलेले जन्म प्रमाणपत्र किंवा ज्या शाळेत तो शेवटी शिकत होता, अशा मान्यताप्राप्त शाळेचे प्रमाणपत्र हे वैध दस्तऐवज असल्याचे मानण्यात येईल. त्यानुसार उमेदवाराने जन्म तारखेचे परिशिष्ठ-५ अ मध्ये हमीपत्र कार्यालय प्रमुखांकडे सादर करावे. त्यानंतर सदर शासन निर्णयाच्या खंड बी मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे शासकीय सेवेत प्रवेश केल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीनंतर अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

६. नेमणूक झालेल्या पदावरुन स्थायी झाले नंतरच आंतर जिल्हा बदली करावयाची झाल्यास त्यासाठी शासन निर्णय दिनांक २९ सप्टेंबर २०११ मधील तरतुदीच्या व प्रचलीत शासन निर्णयाच्या अधीन राहुन तसा अर्ज आपणास प्रशासनाकडे करता येईल.

७. जिल्हा परिषद कार्यक्षेत्रात कोठेही बदलीस पात्र राहतील. तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील दिनांक ०५ जुलै २००८ चे शासन परिपत्रकानुसार नियुक्तीचे ठिकाणी राहणे बंधनकारक राहील, न राहिल्यास शिस्तभंगाची कारवाईस पात्र ठराल याची नोंद घ्यावी.

८. तुम्ही विवाहीत असल्यास तुम्हास एकच पती/पत्नी आहे असे समजण्यात येईल. एकापेक्षा अधिक पती/ पत्नी आढळुन आल्यास तुमची सेवा तात्काळ समाप्त करणेत येईल.

९. खात्याच्या पूर्व परवानगी शिवाय प्रशिक्षण / शिक्षण घेता येणार नाही.

१०. उमेदवाराने खाली दिलेल्या नमुन्यात प्रतिज्ञापत्र भरुन ज्या कार्यालयात नेमणुक करणेत आलेली आहे त्यासंबंधीत अधिकाऱ्याकडे दयावे लागेल मी, श्री/श्रीम .................. रा .................. प्रतिज्ञापत्र लिहून देतो की, जिल्हा परिषद सेवेत माझी जिल्हा सेवा वर्ग-३ कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-क या पदावर झालेली नियुक्ती ही सुधारीत वेतन संरचना S14: 38600-122800 या वेतन श्रेणीत (अधिक प्रचलित नियमानुसार मिळणारा महागाई भत्ता व इतर भत्ते) या मध्ये पुर्णपणे हंगामी स्वरुपाची असून ती कोणतेही कारण अथवा नोटीस न देता संपविण्याचा जिल्हा परिषदेला पुर्ण अधिकार असून त्या अटीवर मी ही नेमणुक स्वीकारत आहे.

११. सदर पदावर रुजू झालेचे दिनांकापासून ३ महिन्याचे आत महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील नियम १७ आणि शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र वशिअ/-१२१४/प्र.क्र.२६/११ दिनांक ०२/०६/२०१४ नुसार विहीत केलेले मत्ता व दायित्व असेटस एण्ड लायबीलीटीज याबाबतचे विवरणपत्र भरुन दयावे. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील १७ (७) नुसार उमेदवारांनी त्यांच्या कुटुंबियांसंबंधी असलेल्या स्थावर व जंगम मालमत्तेची माहिती विहित प्रपत्रात कामावर रुजु झालेपासुन एक महिन्याच्या आत कार्यालय प्रमुखाकडे सादर करणे बंधनकारक राहिल.

१२. सदर पदावर रुजू झाले नंतर जर काही अपरिहार्य कारणास्तव नोकरीचा राजीनामा दयावयाचा असेल तर त्यांनी एक महिना अगोदर तशी नोटीस देणे आवश्यक आहे. व नोटीस देणे शक्य नसेल तर नोटीसेपोटी एक महिन्याचा मुळ पगार जिल्हा फंडात भरावा लागेल.

१३. सदर नियुक्ती आदेश दिनांकापासून पदस्थापनेच्या ठिकाणी एक महिन्याचे आत हजर होणे आपणास बंधनकारक राहिल अन्यथा सदरची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल याची स्पष्टपणे नोंद घ्यावी.

१४. सदर नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपणास महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा नियम (सर्व) व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन अधिसुचना/ निर्णय/ परिपत्रक यामधील तसेच वेळोवळी मुख्य कार्यकारी अधिकारी देतील अशा सर्व निर्देशांचे पालन करणे उमेदवारास बंधनकारक राहील.

१५. सदर प्रकरणी देणेत आलेली माहिती, प्रतिज्ञापत्रे यातील मजकुर खोटे असल्याचे निदर्शनास आल्यास सदरची नेमणुक रद्द करणेत येईल व खोटे प्रतिज्ञापत्र करुन दिल्याबाबत संबंधिताविरुध्द नियमानुसार कारवाई करणेत येईल.

१६. गट क मधील उमेदवारास शासनाने विहीत केलेली, तसेच वेळोवळी विहीत करील अशी विभागीय परिक्षा/ भाषा परिक्षा/ प्रशिक्षण अर्हता विहीत संधी व मुदतीमध्ये प्राप्त करणे बंधनकारक राहिल.

१७. जिल्हा परिषद सेवेत असतांना अगर रजेच्या मुदतीत कोणताही व्यवसाय, धंदा, अगर इतरत्र नोकरी करता येणार नाही.

१८. कार्यालय प्रमुखांना पुढील नामनिर्देशनपत्र देण्यात यावीत **१.** गट विमा योजना २. वैद्यकिय दाखला ३.जातीचा दाखला ४. जातीचे वैधता प्रमाणपत्र ५. स्वग्राम घोषणापत्र ६. शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र मुळ सेवापुस्तक भरतांना उपरोक्त कागदपत्रे डकविण्यात यावी ती डकविण्यात आली आहे किंवा नाही याची खात्री स्वतः करुन घ्यावी.

१९. एम.एस.सी.आय.टी. नियुक्ती मिळालेपासून दोन वर्षात उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा हा कालावधी संपताच उमेदवाराची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल त्यानुसार खातेप्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी सदर कर्मचाऱ्यास कार्यमुक्त करावे.

२०. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक ०१/०७/२००५ अन्वये दोन पेक्षा अधिक मुले असणाऱ्या उमेदवारांना शासन सेवेत नियुक्ती देण्यात प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटंब प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नियुक्त्यासाठी अधिसूचनेत विहीत केलेली लहान कुटुंबाची अतिरिक्त अट लागु झालेली आहे. त्याअनुषंगाने सदर नियमातील प्रतिज्ञापत्र नमुना अ नुसार उमेदवाराकडुन प्रतिज्ञापत्र कार्यालय प्रमुखाने भरुन घ्यावे. सदर नियमानुसार दिनांक २८/०३/२००५ नंतर तिसरे अपत्य असणाऱ्या उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

२१. आपण मागासवर्गीय असल्यास शासन निर्णय दिनांक १२ डिसेंबर २०११ नूसार आपणास नियुक्ती आदेशाच्या तारखे पासून सहा महिन्याच्या आत जातपडताळणी समितीकडुन जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल अन्यथा आपली नियुक्ती रद्द केली जाईल. तरी सदर पदावर रुजु होताच जात वैधता तपासणी करण्यासाठीचा प्रस्ताव संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करुन त्याबाबतची पोहोच पावतीची साक्षांकित प्रत नियुक्ती प्राधिकाऱ्यास सादर करावी. जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास आपणास देणेत आलेली नियुक्ती कोणतीही पुर्व सुचना न देता रद्द करणेत येईल. तसेच महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार पुढील कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी.

२२. ज्या मागासवर्गीय उमेदवारांची निवड खुल्या प्रवर्गातुन झालेली आहे अशा उमेदवारांनाही त्यांच्या जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापि, सदर उमेदवारांसाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणेसाठी विशिष्ट कालमर्यादा असणार नाही.

२३. शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्याकडील शासन निर्णय क्र.घभाम/१००५/प्र.क्र.४६३/पापु १६ दिनांक ८ जुन २००६ अन्वये शासकीय कर्मचारी व अधिकारी यांना शौचालयाचा वापर करणे अनिवार्य करणेत आलेले आहे. त्यानुसार कार्यालय प्रमुख यांनी उमेदवाराकडुन शौचालय असलेबाबत व त्याचा वापर करीत

असलेबाबत प्रमाणपत्र एक महिन्याचे आत घ्यावे. ज्याचेकडे शौचालयाची सुविधा नाही अथवा जे उमेदवार शौचालयाचा वापर करीत नाही त्यांचा घरभाडे भत्ता थांबविण्यात येईल.

२४. शासन वित्त विभाग क्रमांक अनियो/१००५/१२६/सेवा/४, दिनांक ३१/१०/२००५ अन्वये १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ अणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण/ जिल्हा परिषद भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

२५. महाराष्ट्र शासन, वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.रानियो-२०२२/प्र.क्र/३४/सेवा-४ दिनांक ३१/०३/२०२३ अन्वये परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचाऱ्यांचा सेवा कालावधीत मृत्यु झाल्यास त्याच्या कुंटुंबियांना कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यू उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा निवृत्ती उपदान लागू होईल. त्याकरिता आपण शासन सेवेत नियुक्त झाल्यावर आठ दिवसाच्या आत विकल्प कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

२६. प्रस्तुत निवड प्रकरणी न्यायालयीन बाब उद्‌भवल्यास त्याबाबत मा.न्यायालयाच्या निर्देशानुसार नियुक्ती प्राधिकरणाने घेतलेला निर्णय अंतिम राहील.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आला असुन त्याचा सांकेतांक 202505131400.18 असा आहे.

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.ऋषीकेश शंकर कडभणे
पत्ता-जुना शिऊर रोड,जामखेड महाविदयालयाच्या मागे,
छत्रपती शिवाजी नगर,मु.पो.ता.जामखेड जि.अहिल्यानगर
पिनं-४१३२०१ मो.७७७४९६०८६०

प्रत:- माहितीस्तव व पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना.

१. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), जिल्हा परिषद अहिल्यानगर
२. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
३. कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जि.प.अहिल्यानगर
४. गटविकास अधिकारी (उ.श्रे) पंचायत समिती ---------- जामखेड
५. उपअभियंता जि.प.ग्रा.पा.पु. उपविभाग---- जामखेड

२/- संबधित नियुक्त उमेदवारास नियमानुसार हजर करुन घेण्याबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावरुन करावी. तसेच संबधीतांच्या सर्व मुळ कागदपत्रांची पडताळणी आपल्या स्तरावरुन करावी व त्यानंतरच संबधीतास रिक्त पदावर हजर करुन घ्यावे. संबधीताचा हजर अहवाल या कार्यालयास सादर करावा.

६. स्थळ प्रत निवड नस्ती

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर